**नियमीत दिवाणी दावा क्र. ४६१/२०१६**
**निशाणी २३ खाली**

**शपथेवर पुढील उलटतपास प्रतिवादीतर्फे वकील श्री. सुरेश के. नायर यांचेमार्फत.**

सध्या मी बिझनेस करतो. मी कंपनीचा डायरेक्टर आहे. मी फार्मा मॅनेजमेंटमध्ये पोस्ट ग्रॅज्युएशन केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी दावा व्यवहारामध्ये सहभागी आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी बिल्डरकडून दिनांक १७/०७/२०१२ रोजी सदनिका खरेदी केलेली आहे. काही लोनची रक्कम बिल्डरला देणे बाकी होती. कराराच्या वेळी मी बिल्डरला ८.५ लाख देणे बाकी होते आणि बांधकाम पूर्ण झाल्यानंतर देखील काही रक्कम देणे बाकी होते. बिल्डरबरोबर माझी ओळख ब्रोकरने करुन दिली होती. ब्रोकरचे नाव श्री. अनमोल होते. हे म्हणणे खरे आहे की, मी भारत को. ऑप बॅंक मधून दावा सदनिकेकरीता कर्ज घेतले होते. मी बॅंकेकडून सदनिका विकण्याच्या आधी ना हरकत दाखला घेतली किंवा कसे हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला सदनिकेचा ताबा आणि चावी अदयाप मिळालेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी दिनांक २१/१०/२०१४ रोजी प्रतिवादींबरोबर करार केला होता. बिल्डरकडून ताबा घेतल्याशिवाय मी ती सदनिका पुन्हा दुस-या व्यक्तिस विकू शकत नाही याबाबत मला कायदयाचे ज्ञान नाही. प्रतिवादी बरोबर केलेल्या करारामध्ये मोबदला रक्कम ही ४३.५ लाख इतकी होती. मला ८.५ लाख रुपये मोबदल्यापोटी मिळालेले आहेत. मला प्रतिवादीकडून दिनांक २२/०१/२०१४ रोजी रक्कम रुपये ४ लाख मिळालेले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, माझेत व प्रतिवादीमध्ये मोबदल्याची रक्कम रु.५८,०४,७५०/- ठरली होती. हे म्हणणे खरे आहे की, बिल्डींगचे बांधकाम अदयाप पूर्ण झालेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, व्यवहार हा करार झाल्यापासून ४५ दिवसांच्या आत पूर्ण करायचा होता. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी यांनी रक्कम रु.१,८०,०००/- व्यवहार पूर्ण

करण्यास उशीर झाल्याबाबत नुकसान भरपाई म्हणून देण्याचे मान्य केले होते. बिल्डरच्या फौजदारी प्रकरणामुळे बिल्डींगचे बांधकाम पूर्ण झाले नाही याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, नविन बिल्डरकडून मी सदनिका क्र. ७०१ चे माहितीची मागणी केली. आजपर्यंत मी प्रतिवादी यांनी मला दिलेली ८.५ लाख रुपये रक्कम परत केलेली नाही. प्रतिवादी यांनी या व्यवहाराकरीता त्यांच्या आय.डी.बी.आय. बॅकेकडून ३५ लाखाचे कर्ज घेतल्याबाबत मला माहिती आहे. मी प्रतिवादी यांना सर्व दस्तऐवज कर्ज मिळविण्याकरीता पुरविले होते. हे म्हणणे खरे नाही की, बिल्डींगचे टायटल अदयाप क्लिअर नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी यांना मी दिनांक २९/०१/२०१६ रोजी दिलेल्या नोटीसमध्ये त्यांच्याकडून घेतलेल्या रक्कम परत देण्याबाबत मी काहीच उल्लेख केला नाही. सदरचा दावा प्रकरण मी प्रतिवादी बरोबर कोटा र्बाहेर समंजसपणाने मिटविण्याचा प्रयत्न केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, कोर्टाकडून आदेश प्राप्त करण्याकरीता मी कोर्टाची दिशाभूल केली. मी प्रतिवादीविरुध्द अदयाप कोणताही फौजदार खटला अगर एफ.आय.आर. दाखल केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादी यांना त्यांच्याकडून घेतलेली रक्कम परत करण्यापासून मी स्वत:ला परावृत्त केले. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे प्रतिज्ञापत्र दाखल केले व खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by NAYOMI PRAKASH PAWAR
Date: 2026.08.11 15:53:42 +0530

पनवेल,
दिनांक : ११-०८-२०२६

(नयोमी पी. पवार)
दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर पनवेल.